
ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक १८८ • गुरुवार दि.२३ एप्रिल २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# हडसणी फाट्याजवळ कार-दुचाकी अपघातात चार जण ठार







हदगांव/प्रतिनिधी- तालुक्यातील हडसणी फाटा ते तामसा या रस्त्यावर कार व दोन दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात चार जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी रात्री दहाच्या सुमारास घडली. मयतामध्ये एकाच कुटुंबातील तीघांचा समावेश आहे.

या घटनेची माहिती अशी की, बुधवारी रात्री १० च्या सुमारास एम.एच.१२ के.एन. २५०९ या क्रमांकाच्या भरधाव वेगातील स्विफ्ट डिझायर कारने हडसणी फाट्यावर दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. यातील पहिल्या दुचाकीवरील रेखाबाई भाऊराव नरवाडे (वय ४२), मुलगा यशवंत भाऊराव नरवाडे (वय २३) आणि नणंद अनुसया बालाजी लोणाळे (वय ४३) या तिघांचा जागीच मृत्यू झाला. मयत तीघेही नातेवाईकांकडील वाढदिवसाचा कार्यक्रम आटोपून गावाकडे निघाले होते. परंतु वाटेतच त्यांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. दुसऱ्या दुचाकीवरील दोन जण गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती समजताच हदगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने हदगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, भोकर येथील रहिवासी असलेल्या एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दुसऱ्या जखमीला पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलवण्यात आले असून त्यांची प्रकृतीही चिंताजनक असल्याचे समजते.हडसणी फाटा हा सध्या मृत्यूचा सापळा ठरत आहे. धक्कादायक बाब म्हणजे दि.२१ एप्रिल रोजी याच ठिकाणी दोन अपघात झाले होते आणि दुसऱ्याच दिवशी हा भीषण थरार घडला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रल्हाद पाटील हडसणीकर यांनी यापूर्वी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदने देऊन व आंदोलने करून येथे गतिरोधक, रेडियम इंडिकेटर्स आणि हायमास्ट लाईट बसवण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याने निरपराध नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. सततच्या अपघातांमुळे हडसणी गावातील नागरिक आज दि.२३ एप्रिल रोजी प्रचंड आक्रमक झाले. संतप्त ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पान ४ वर

# आ.संजय गायकवाडांकडून प्रकाशकाला कथित धमकी;राज्यात तीव्र प्रतिक्रिया




मुंबई/प्रतिनिधी-दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहिलेल्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिंदे गटाचे वादग्रस्त आ. संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवर शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्यात तीव्र संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. राजकीय आणि सामाजिक साम्यवादी नेते कॉ.गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तका संदर्भात शिवाजी महाराजांना एकेरी बोलणाऱ्यांना सोडणार नाही. तुलाही घरात घुसून मारेन, जीभ छाटेन अशा शब्दांसह या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्या कुटुंबियातील स्त्रीयांबद्दल अवमानास्पद वक्तव्य केल्याची ऑडिओ क्लीप व्हायरल झाली आहे. या कथित वक्तव्यामुळे पान ४ वर

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा संप तिसऱ्या दिवशीही सुरुच



नांदेड/प्रतिनिधी-गेल्या दिर्घकाळापासून प्रलंबित आसणाऱ्या जिव्हाळ्याच्या रास्त मागण्यांसाठी राज्यसरकारी कर्मचाऱ्यांनी दि.२१ एप्रिल २०२६ पासून सुरू असलेला संप आज तिसऱ्या दिवशीही सुरूच आहे.

राज्यसरकारने मान्य केलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करावी!, कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भराव्यात, सेवानिवृत्त वय ६० वर्षे करावे, शिक्षकांना १०,२०,३० या तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, १ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, निकषपात्र विनाअनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे यांच्यासह अनेक इतर मागण्यांसाठी २१ एप्रिल पासून चालू असलेला संप तोडगा न निघाल्यामुळे आज तिसऱ्या दिवशीही पान ४ वर

# प.बंगालच्या मतदानावर हिंसाचाराचे सावट

## भाजप उमेदवारांवर हल्ले,दगडफेक,बॉम्ब स्फोटाने खळबळ

कोलकाता:प.बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील १५२ जागांसाठी गुरुवारी सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली. विविध भागांत हिंसाचाराच्या घटना समोर आल्या. भाजप उमेदवारांवर हल्ले, तृणमूल काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांमधील संघर्ष, दगडफेक तसेच देशी बॉम्बस्फोटांमुळे मतदान प्रक्रियेवर तणावाचे सावट पसरले.

दक्षिण मिदनापूर जिल्ह्यातील कुमारगंज मतदारसंघात भाजप उमेदवार शुभेंदू सरकार यांच्यावर जमावाने हल्ला केल्याची घटना घडली. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये ते जीव वाचवण्यासाठी धावताना दिसत असून, सुरक्षारक्षक उपस्थित असतानाही जमावाने त्यांना गाठून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.आसनसोल दक्षिण मतदारसंघातील भाजप उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या वाहनावरही हल्ला झाला. बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात मतदान केंद्रातून बाहेर पडत असताना त्यांच्या कारवर दगडफेक करण्यात आली. या घटनेत वाहनाची मागील काच फुटली. याप्रकरणी त्यांनी हिरापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.मुर्शिदाबाद जिल्ह्यातील नौदा भागात बुधवारी रात्री उशिरा देशी बॉम्ब फेकण्यात आल्याची घटना घडली. यात काही नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे. गुरुवारी सकाळी हुमायून कबीर घटनास्थळी पोहोचले असता तणाव निर्माण झाला. पोलिसांवर पक्षपाती कारवाईचा आरोप करत त्यांनी धरणे आंदोलन सुरू केले. पोलिसांनी या प्रकरणात दोघांना अटक केली आहे.सिलीगुडीमध्येही भाजप आणि तृणमूल काँग्रेस कार्यकर्ते आमनेसामने आल्याने वातावरण तापले. मालदा येथील एका मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने मतदारांनी संताप व्यक्त करत निवडणूक अधिकाऱ्यांना घेराव घातला. हिंसाचाराच्या घटनांनंतरही अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या पान ४ वर

# आ.संजय गायकवाडांवर कठोर कारवाई करा

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



नांदेड/प्रतिनिधी-ज्येष्ठ साम्यवादी विचारवंत कॉ.गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या चर्चित पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाण्याचे आ.संजय गायकवाड यांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी त्यांच्यावर कठोर गुन्हा दाखल करून त्यांची आमदारकी रद्द करावी अशी मागणी नांदेड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

भाकपच्या वतीने मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कॉ. गोविंद पानसरे यांनी सन १९८८ मध्ये शिवाजी कोण होता? हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकाला राज्यभर मोठा प्रतिसाद मिळाला असून विक्रीचे विक्रमही प्रस्थापित झाले आहेत.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, दोन दिवसांपूर्वी आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरून अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. तसेच तुम्हाला पानसरेकडे पाठवतो अशी धमकी देत जीवे मारण्याची धमकी दिली. याशिवाय त्यांच्या आई व पत्नीबाबतही खालच्या स्तरावरील भाषा वापरून गंभीर अपमान व विनयभंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे.ही घटना अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला असून कायदा व सुव्यवस्थेस बाधा आणणारी असल्याचे भाकपने म्हटले आहे. त्यामुळे संबंधित आमदारांवर तातडीने गुन्हा दाखल करून अटक करावी, त्यांची आमदारकी रद्द करावी, तसेच लेखक, प्रकाशक व कार्यकर्त्यांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच प्रकाशक प्रशांत आंबी व त्यांच्या कुटुंबीयांना तात्काळ पोलिस संरक्षण द्यावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही पक्षाने दिला आहे. या निवेदनावर कॉ.शिवाजी फुलवळे, कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ.देवराव नारे, कॉ. वैशाली धुळे, कॉ. गणेश संदूपटला व कॉ. प्रकाश बैलकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजपा युवा मोर्चाच्या वतीने नांदेडमध्ये जनआक्रोश आंदोलन



नांदेड/प्रतिनिधी- नारीशक्ती वंदन अधिनियम कायद्याला विरोध करणाऱ्या काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या धोरणांचा नांदेडमध्ये तीव्र निषेध करण्यात आला. भारतीय जनता पार्टी महानगर युवा मोर्चाच्या वतीने गुरुवारी आयटीआय चौक परिसरात जनआक्रोश आंदोलन करण्यात आले.


नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक भाजपाने लोकसभेत मांडले होते. या कायद्यामुळे महिलांना लोकसभा व विधानसभेत टक्के आरक्षण मिळणार आहे. परंतु, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करून आपली महिलाविरोधी मानसिकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा महानगरच्या वतीने आयटीआय चौकात जनआक्रोश आंदोलन करण्यात आले आहे. हे विधेयक संसदेत पारित व्हावे आणि काँग्रेससह विरोधी पक्षांनी महिलांच्या समर्थनातील या विधेयकाला पाठिंबा द्यावा, अन्यथा भाजपा युवा मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी भाजप युवा मोर्चाच्यावतीने देण्यात आला. या आंदोलनात भाजपाचे महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष शशिकांत पाटील क्षीरसागर, महिला बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, महिला मोर्चा अध्यक्ष सौ. ज्योतीताई कल्याणकर, नगरसेविका सुप्रियाताई संजय पाटील रातोळीकर, कविता गड्डम, पान ४ वर

# संताप व्यवस्थेविरुद्ध, व्यक्तीविरुद्ध नव्हे

**महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर देशातील राजकारण पुन्हा एकदा तापलेले दिसत आहे. केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष यांनी या विषयावर चर्चा घडवून आणण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावले. मात्र आवश्यक संख्याबळाच्या अभावामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. संख्याबळ अपुरे असल्याची जाणीव असतानाही अधिवेशन बोलावण्यात आले, यामागील राजकीय हेतूवर विरोधकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणानंतर विरोधकांवर, विशेषतः भारतीय राष्ट्रीय काँग्रेसवर टीकेची झोड उठवली आहे. महिला आरक्षणाला विरोध केल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या वतीने विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले. वरळी येथे काढलेल्या अशाच एका मोर्चात हजारो महिला कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. हा मोर्चा राजकीय शक्तिप्रदर्शनाचा भाग असला, तरी त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य नागरिकांना भोगावे लागले.मोर्चामुळे रस्ते पूर्णपणे ठप्प झाले, वाहतूक कोलमडली आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागला. याच दरम्यान एका महिलेचा संताप अनावर झाला. आपल्या मुलाची शाळेची बस शोधण्यासाठी सुमारे दीड तास रस्त्यावर उभी राहिलेल्या त्या महिलेने मोर्चातील नेत्यांना, विशेषतः राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना जाहीरपणे खडे बोल सुनावले. तिच्या शब्दांत केवळ वैयक्तिक त्रास नव्हता, तर संपूर्ण व्यवस्थेविषयीची खोल नाराजी स्पष्टपणे दिसून येत होती.या घटनेनंतर समाजमाध्यमांवर त्या महिलेच्या प्रतिक्रियेची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. अनेकांनी तिच्या धाडसाचे कौतुक केले, तर काहींनी तिच्या भाषेवर आक्षेप घेतला. गिरीश महाजन यांनी तिचा राग समजू शकतो असे म्हटले, मात्र तिची भाषा अयोग्य असल्याचे नमूद केले. तसेच तिने मोर्चावर बाटली फेकल्याचा आरोपही त्यांनी केला. यानंतर समाजमाध्यमांवर विविध प्रतिक्रिया उमटल्या जर ही महिला विरोधी पक्षाशी संबंधित असती, तर तिच्यावर अधिक कठोर कारवाई झाली असती का?, असा सवाल अनेकांनी उपस्थित केला.या संपूर्ण घटनेचा मूळ आशय समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्या महिलेचा संताप हा कोणत्याही एका व्यक्तीविरोधात नव्हता. तो संताप होता त्या व्यवस्थेविरुद्ध, जी राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य देताना सामान्य नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करते. लोकशाही व्यवस्थेत मोर्चे आणि आंदोलन हे अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे, मात्र त्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होऊ नये, ही अपेक्षा रास्त आहे. ''एक नारी सर्वांवर भारी'' ही म्हण या प्रसंगात केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून ती सामान्य नागरिकांच्या भावना व्यक्त करणारी ठरते. त्या महिलेने व्यक्त केलेली नाराजी ही अनेकांच्या मनात दडलेली होती. तिच्या एका कृतीने संपूर्ण चर्चेचा केंद्रबिंदू बदलला, मोर्चाच्या राजकारणापासून व्यवस्थेच्या अपयशाकडे. राजकीय पक्षांनी या घटनेतून धडा घेणे अत्यंत आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणाचा मुद्दा केवळ विधेयकांपुरता मर्यादित न ठेवता, महिलांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी सोडवण्यावर भर दिला पाहिजे. अन्यथा, अशा घटना वारंवार घडत राहतील आणि ''नारी शक्ती'' ही केवळ घोषणांमध्येच मर्यादित राहील. शेवटी, लोकशाहीत प्रत्येक नागरिकाचा आवाज महत्त्वाचा असतो. त्या महिलेचा संताप हा अपवाद नसून एक स्पष्ट इशारा आहे, व्यवस्थेला बदलाची गरज आहे. सामान्य नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये अडकून राहणे, ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. आता तरी सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही आत्मपरीक्षण करून जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवण्याची वेळ आली आहे.**

# पुस्तकांचा उत्सव:वाचन, विचार आणि संस्कृतीचा सेतू






जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन हा दरवर्षी २३ एप्रिल रोजी जगभरात साजरा केला जातो. युनेस्कोने १९९५ मध्ये स्थापित केलेल्या या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट वाचनाची आवड, प्रकाशन आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी कॉपीराइटचे महत्त्व वाढवणे हे आहे. या दिवशी शिक्षण, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि वैयक्तिक विकासासाठी पुस्तकांची भूमिका अधोरेखित केली जाते. लोकांना वाचनाचा आनंद आणि कथाकथनासाठी प्रोत्साहन दिले जाते. लेखकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीतील अमूल्य योगदानाचा गौरव केला जातो, कॉपीराइट कायद्यांची जागरूकता वाढवली जाते जेणेकरून लेखकांना योग्य मोबदला मिळावा आणि त्यांची मूळ रचना चोरीपासून वाचवली जावी. पुस्तके पिढ्यान्पिढ्या आणि संस्कृतींमधील पूल बांधून वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील कल्पनांचा शोध घेण्याची संधी देतात.

हा दिवस २३ एप्रिल रोजीच साजरा करण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या दिवसाची सुरुवात स्पेनमधील कॅटलोनियातून झाली असून, तेथे २३ एप्रिल हा संत जॉर्जचा दिवस (दि दा द सँत जॉर्डी) म्हणून ओळखला जातो. येथे प्राचीन परंपरेनुसार प्रेमासाठी गुलाब आणि शाश्वततेसाठी पुस्तकांची देवाणघेवाण केली जाते. कॅटलोनियन परंपरा म्हणजे स्पेनातील कॅटलोनिया प्रदेशात २३ एप्रिल रोजी साजरा होणारा दि दा द सँत जॉर्डी (Diada de Sant Jordi) किंवा डिया देल लिब्रे इ दे ला रोजा (पुस्तकँ व गुलाबांचा दिवस) हा उत्सव, जो संत जॉर्ज (Sant Jordi) या कॅटलोनियाच्या संरक्षक संताच्या स्मृतीत साजरा केला जातो. या परंपरेची सुरुवात मध्ययुगीन काळात झाली असून, त्यामागे एक प्रसिद्ध कथा आहे: कॅटलोनियातील माँटब्लँक या छोट्या गावात एक भयंकर ड्रॅगन रहिवाशांना त्रास देत होता आणि दररोज एक व्यक्तीला बलिदान म्हणून दिले जात असे. एकदा राजकन्येची पाळी आली, तेव्हा संत जॉर्जने ड्रॅगनशी लढा दिला, त्याला मारले आणि त्याच्या रक्तातून एक लाल गुलाबाची झाडी उगवली. संत जॉर्जने त्या गुलाबाची फुलं काढून राजकन्येला दिली, ज्यामुळे प्रेम आणि शौर्याचे प्रतीक म्हणून लाल गुलाबाची परंपरा निर्माण झाली. या कथेनुसार, दरवर्षी एप्रिल महिन्यात गुलाब फुलतात. या दिवशी पारंपरिकरीत्या पुरुष आपल्या प्रिय स्त्रियांना (पत्नी, आई, मुलगी किंवा सहकारींना) लाल गुलाब देतात, तर स्त्रिया पुरुषांना पुस्तक देतात-पुस्तक हे ज्ञान, संस्कृती आणि शाश्वततेचे प्रतीक मानले जाते. आधुनिक काळात ही देवाणघेवाण दोन्ही लिंगांसाठी समान झाली आहे आणि मित्र-मैत्रिणींमध्येदेखील पुस्तके-गुलाबांची अदलाबदल केली जाते. गुलाबांना कॅटलोनियन ध्वजाच्या रंगांच्या रिबनने (लाल-पिवळे) बांधले जाते आणि त्यासोबत गव्हाची कणगी जोडली जाते.

पुस्तकांची परंपरा १९२०-३०च्या दशकात सुरू झाली; १९२६ मध्ये बार्सेलोनातील एका पुस्तक विक्रेत्याने मिगेल द सर्व्हान्तेसच्या स्मृतीत पुस्तक देण्याचा प्रस्ताव दिला आणि तो कॅटलोनियात अधिक लोकप्रिय झाला, ज्यामुळे तो कॅटलोनियन सांस्कृतिक ओळख आणि भाषेच्या संरक्षणाशी जोडला गेला. आज कॅटलोनियातील रस्ते, विशेषतः बार्सेलोनामध्ये, पुस्तक आणि गुलाबांच्या स्टॉल्सने भरलेले असतात; दरवर्षी सरासरी ४० लाख गुलाब आणि ५ लाख पुस्तके विकली जातात. हा दिवस कॅटलोनियन व्हॅलेंटाइन डे म्हणून ओळखला जातो, ज्यात प्रेम, साहित्य आणि सांस्कृतिक अभिमान एकत्र येतात.दुसरे देखील एक प्रतीकात्मक महत्त्व आहे, याच तारखेला १६१६ मध्ये मिगेल द सर्व्हान्तेस, विल्यम शेक्सपिअर आणि इंका गार्सिलासो द ला वेगा यांसारख्या प्रमुख लेखकांचा मृत्यू किंवा जन्मदिन साजरा होतो, तसेच मॉरिस द्रुओ, हल्डोर के. लॅक्सनेस, व्लादिमीर नाबोकोव आणि मॅन्युएल मेजिया व्हॅलेजो यांसारख्या इतर नामवंत लेखकांचाही जन्म किंवा स्मृतिदिन याच दिवशी येतो. नोव्हेंबर १९९५ मध्ये फेडेरिकोचे महापौर यांनी प्रकाशक लोकशाहीचे अध्यक्ष पेरे व्हिसेन्स यांना पत्र पाठवून कळवले की, २३ एप्रिल हा जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिवस म्हणून जाहीर करण्यात आले आहे. याच परंपरेने युनेस्कोला प्रेरणा दिली आणि २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक उत्सवाची सुरुवात झाली.

२३ एप्रिल १९९६ हा दिवस विशेष ठरला जेव्हा आंतरराष्ट्रीय प्रकाशक संघटनेच्या १००व्या वर्धापनदिनी बार्सिलोना येथे परिषद आयोजित करण्यात आली होती आणि त्याच दिवशी जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन प्रथमच प्रकाशित करण्यात आले. युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय पुस्तक उद्योग संघटनांद्वारे दरवर्षी एक शहर वर्ल्ड बुक कॅपिटल म्हणून नियुक्त केले जाते ज्यामुळे वर्षभर स्थानिक उपक्रम राबवले जातात; २०२४ वर्षी स्ट्रासबर्ग (फ्रान्स), २०२५ साली रियो द जनेरो (ब्राझील) आणि २०२६ साली रबात (मोरोक्को) ही शहरे निवडण्यात आली आहेत. जागतिक पुस्तक दिन हा वाचनसंस्कृतीचा उत्सव आहे.पुस्तक हे केवळ ज्ञानसंचयाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. एका भाषेत जन्मलेले विचार जेव्हा दुसऱ्या भाषेत पोहोचतात, तेव्हा ज्ञानाची सीमा विस्तारते. ही सीमोल्लंघनाची प्रक्रिया म्हणजे भाषांतर. पुस्तक आणि भाषांतर यांचे नाते हे ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने अतूट आहे. हा दिवस केवळ साजरा करण्यासाठी नव्हे तर वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आणि पुस्तकांशी आपली जवळीक वाढवण्यासाठी आहे. साहित्यपरंपरेचा गौरव आणि जागतिक स्तरावर लेखकांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी ही तारीख प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जाते. युनेस्को, पुस्तक प्रकाशक, विक्रेते, ग्रंथालये आणि शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून या दिवशी पुस्तक मेळे, वाचन सत्रे, लेखक-भेटी, पुस्तक दान, कथा-कविता वाचन, साहित्य स्पर्धा आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात. सोशल मीडियावर World Book Day सारखे हॅशटॅग वापरून वाचक आपली आवडती पुस्तके शेअर करतात.

जगातील अनेक श्रेष्ठ साहित्यकृती आपण आपल्या मातृभाषेत वाचू शकतो, याचे श्रेय भाषांतराला जाते. म्हणून भाषांतरकार हा दोन संस्कृतींना जोडणारा सर्जनशील दुवा असतो आणि उत्कृष्ट भाषांतर ही स्वतःमध्ये एक स्वतंत्र साहित्यकृती ठरते. जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने हे भाषांतरकारांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे, कारण ते वाचन संस्कृतीला जागतिक स्तरावर जोडते आणि पुस्तकांना खऱ्या अर्थाने पिढ्यान्पिढ्या आणि संस्कृतींमधील पूल बनवते. विल्यम शेक्सपिअर यांची नाटके, लिओ टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्या, फ्योदोर दोस्तोवस्की यांचे मानसशास्त्रीय लेखन किंवा गॅब्रिएल गार्सिया मार्केझ यांचा जादुई वास्तववाद हे सर्व आपण आपल्या भाषेत अनुभवू शकतो. भाषांतरामुळे साहित्य खऱ्या अर्थाने जागतिक बनते आणि संस्कृतींमधील सीमारेषा मिटवते; ज्यामुळे वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील जग, विचार आणि भावना समजतात. भारतीय संदर्भात भाषांतराचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते, कारण बहुभाषिक भारतात ते ज्ञान, संस्कृती आणि सामाजिक जागृतीचा पूल बनते. रवींद्रनाथ टागोर यांनी स्वतःच्या रचनांचे भाषांतर करून भारतीय साहित्याला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली; प्रेमचंद यांच्या कथा सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब विविध भारतीय भाषांमध्ये दिसते. मराठी साहित्यात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर आणि शिवाजी सावंत यांच्या साहित्यकृती इतर भाषांमध्ये उपलब्ध झाल्यामुळे मराठी विचारविश्व अधिक व्यापक आणि प्रभावी झाले आहे.


कल्पना पांडे


स्त्री साहित्यिकांच्या लेखनानेही समाजमनाला नवी दिशा दिली आहे; इस्मत चुगताई यांच्या लेखनाने स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न ठळक केला, महाश्वेता देवी यांनी वंचित घटकांचे प्रश्न मांडले, तर मराठीत गौरी देशपांडे यांच्या साहित्याने स्त्रीमनाचे सूक्ष्म चित्रण केले. या साहित्यकृतींचे विविध भाषांतील भाषांतर झाल्यामुळे स्त्रीवादी विचार व्यापक समाजापर्यंत पोहोचले आणि लिंगसमानतेच्या चळवळीला बळ मिळाले. वीणा गवाणकर यांनी १९७९ मध्ये लिहिलेल्या एक होता कार्व्हर या पहिल्या चरित्रकथनाने मराठी साहित्यात क्रांती घडवली; अमेरिकन कृषिविद् जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित हे पुस्तक १८ हून अधिक आवृत्त्या प्रकाशित झाले आणि विद्यार्थी, शेतकरी, शिक्षक ते सामाजिक कार्यकर्ते यांना प्रेरित करत राहिले. हे कार्य भाषांतर आणि पुनर्कथन यांच्या माध्यमातून ज्ञानसमृद्धी घडवणारे आहे. सामाजिक आणि कायदेविषयक साहित्याच्या दृष्टीनेही भाषांतर महत्त्वपूर्ण आहे. रशियन भाषांतरित पुस्तकांनी विविध भाषांतील जगभरातील लाखो वाचकांना मानवी मनाच्या गहन खोल्यांचा, समाजव्यवस्थेच्या जटिलतेचा आणि जीवनातील सत्यांचा अनुभव घेण्याची अनमोल संधी दिली आहे. ही पुस्तके वाचकांना स्वतःच्या अनुभवांच्या पलीकडील कल्पना, भावना आणि विचारांच्या दुनियेत घेऊन जातात. रशियातील १९ व्या शतकातील सामाजिक-राजकीय वातावरण, मानवी संघर्ष आणि नैतिक प्रश्न आजही भारतीय वाचकांना इतके जवळचे वाटतात की, भाषांतर झाल्यावरही ते आपले वाटतात. या पुस्तकांमुळे आपण केवळ रशियन संस्कृती समजून घेत नाही, तर स्वतःच्या आयुष्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहू शकतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानविषयक लेखन, सामाजिक न्यायावरील भाष्य आणि भाषणे विविध भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव सर्व स्तरांवर जाणवतो. भारतीय राज्यघटना आणि कायदे विषयक पुस्तके मातृभाषेत उपलब्ध झाल्यामुळे सामान्य नागरिकांनाही आपल्या अधिकारांची जाणीव होते आणि लोकशाही अधिक मजबूत बनते.भारतामध्येही या दिवसाला विशेष महत्त्व आहे. नॅशनल बुक ट्रस्ट द्वारे राज्य ग्रंथालये, शाळा आणि विविध साहित्यिक संस्थांमार्फत वाचन प्रेरणा दिन म्हणून अनेक उपक्रम राबवले जातात. पुस्तक प्रदर्शने, लेखक-वाचक भेटी, कथा-कविता स्पर्धा, सामूहिक वाचन सत्रे आणि दिवसाला एक पुस्तक यांसारखी वैयक्तिक आव्हाने यामुळे वाचनाची सवय दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रातही ग्रंथालय चळवळ आणि साहित्यसंमेलने यांच्या माध्यमातून पुस्तकांबद्दलची जिव्हाळ्याची परंपरा जपली जाते.तथापि, वाचनसंस्कृतीसमोर काही गंभीर आव्हानेही उभी आहेत. डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, सोशल मीडियामुळे कमी होत चाललेले लक्षवेधक कालावधी, महागडी पुस्तके, ग्रामीण भागात ग्रंथालयांची अपुरी उपलब्धता, तसेच कॉपीराइट उल्लंघनामुळे लेखक आणि प्रकाशकांचे होणारे आर्थिक नुकसान ही काही प्रमुख अडचणी आहेत. ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्स ही नवी साधने असली तरी त्यातून पारंपरिक वाचनाची सवय कमी होण्याची भीतीही व्यक्त होते. त्यामुळे पुस्तकप्रेमी, शिक्षक, पालक आणि धोरणकर्ते यांनी मिळून वाचनसंस्कृती टिकवण्याचे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. आज डिजिटल युगात ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्समुळे भाषांतराचे क्षेत्र अधिक विस्तारले आहे. जागतिक साहित्य एका क्लिकवर उपलब्ध होत आहे. अशा काळात भाषांतराचे महत्त्व अधिक वाढले आहे. पुस्तक दिन हा केवळ वाचनाचा नव्हे, तर विविध संस्कृतींना जोडणाऱ्या ज्ञानसेतूचा उत्सव आहे.

वैयक्तिक पातळीवर हा दिवस साजरा करणे अत्यंत सोपे आहे. एखादे आवडते पुस्तक हातात घेऊन काही वेळ शांतपणे वाचन करणे, कुटुंबासोबत सामूहिक वाचन करणे, जवळच्या ग्रंथालयाला भेट देणे, मित्रांना एखादे चांगले पुस्तक सुचवणे किंवा स्वतः सुंदर बुकमार्क तयार करणे अशा छोट्या कृतीतूनही मोठा संदेश देता येतो. वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती विचारांना चालना देणारी, संवेदनशीलता वाढवणारी आणि व्यक्तिमत्त्व घडवणारी सर्जनशील कृती आहे. जागतिक पुस्तक दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षणाचा आणि वाचनाशी नाते दृढ करण्याचा दिवस आहे.पुस्तकांच्या माध्यमातून आपण केवळ ज्ञानसंपदा नव्हे तर अनुभव, संस्कृती आणि मूल्यांची परंपरा पुढील पिढीकडे पोहोचवू शकतो. यंदा २३ एप्रिल रोजी तुम्ही कोणते पुस्तक वाचणार आहात, हा प्रश्न स्वतःला विचारण्याची आणि त्याचे कृतीत उत्तर देण्याची हीच योग्य वेळ आहे. म्हणूनच या पुस्तक दिनी आपण अधिकाधिक वाचन करण्याचा संकल्प करूया. विविध भाषांतील साहित्याचा आस्वाद घेऊया. लेखक आणि भाषांतरकार यांच्या योगदानाची कदर करूया. कारण पुस्तक आणि भाषांतर यांचे नाते हे मानवतेला जोडणारे, विचारांना दिशा देणारे आणि समाजाला समृद्ध करणारे आहे.

प्रसिद्ध जर्मन लेखक हर्मन हेस त्यांच्या द मॅजिक ऑफ द बुक या लिखाणात म्हणतात की, माणसाने स्वतःच्या बुद्धीने निर्माण केलेल्या जगांमध्ये पुस्तकांचे जग सर्वात मोठे आहे. एखादे मूल जेव्हा प्रथम अक्षरे लिहायला आणि वाचायला शिकते, तेव्हा ते एका गुंतागुंतीच्या आणि कृत्रिम जगात प्रवेश करते. शब्द, लेखन आणि पुस्तके नसती, तर इतिहासच अस्तित्वात आला नसता आणि मानवतेची संकल्पनाही निर्माण झाली नसती. यूनेस्को च्या शब्दांत पुस्तके ही विचारांची देवाणघेवाण करण्यासाठीची सर्वात सुंदर निर्मिती असून दारिद्र्याविरुद्ध लढा देण्यासाठी आणि शाश्वत शांतता निर्माण करण्यासाठी प्रभावी साधन आहेत. आजच्या काळात या विधानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप



नांदेड/प्रतिनिधी- महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मानसपुरी ता.कंधार येथे आरती शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेने हा उपक्रम उत्साहात राबविला.

संस्थेचे अध्यक्ष आनंदा डोईजड यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात असून, यंदाही विविध उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.कार्यक्रमाच्या प्रारंभी सरपंच प्रतिनिधी बालासाहेब पाटील मानसपुरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी उपसरपंच किरण कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य गणेश गोरे, कार्तिक गोरे, बालाजी शिंदे, संभाजी पाटील मानसपुरे, सैनाजी डोईजड, गजानन स्वामी, ज्ञानेश्वर पांचाळ, प्रशांत पांचाळ, मंजुळाबाई डोईजड, सत्यभामा पेंढारे, सीमा कोंडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून परिसरात त्याचे स्वागत करण्यात येत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## मुदखेड येथील दोन सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड येथील दोन सराईत गुन्हेगारांना सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

मुदखेड शहरातील असद चाऊस गौस अहमद चाऊस (वय २६), मो.फैजान मो.इब्राहिम (वय २३) दोघे रा.बागमार गल्ली यांच्या विरुध्द अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीसांनी त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांच्या वर्तवणुकीत सुधारणा झाली नाही. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक संजिवन मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक धीरज चव्हाण यांनी दोन्ही गुन्हेगारांविरुध्द हद्दपारीचा प्रस्ताव तयार करुन पोलीस अधीक्षकांकडे पाठविला होता. सदरील प्रस्ताव महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ अन्वये दि.१६ एप्रिल रोजी मंजूर करण्यात आला. दोन्ही गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

# पाठलाग करुन सागवान लाकडाने भरलेली पिकअप जप्त ;दोन तस्कर ताब्यात

## किनवटमध्ये वनविभागाची धडक कारवाई!



किनवट/प्रतिनिधी-डोंगरगाव ते इस्लापूर राष्ट्रीय महामार्गावरील चंद्रभागा हॉटेलजवळ पाठलाग करून सागवान लाकडाने भरलेला पिकअपगाडी आणि दोन लाकूड तस्कर ताब्यात घेतले. तिसऱ्या तस्करांच्या शोधात पथक हिमायतनगरकडे गेल्याचे समजले. निजामाबादकडे हे लाकूड जाणार होते. सुमारे तीन लाख रुपयांच्या आसपास मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२३ एप्रिल रोजी पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास डोंगरगावाकडून इस्लापूरकडे लाकूड तस्करी करतांना सदरची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती शिवणी परिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एन.चोले यांनी दिली आहे.

जलधारा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी बी.बी. संदुपटलवार आणि शिवणी परिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी एस.एन.चोले यांनी विभागीय व्यवस्थापक वन प्रकल्प विभाग किनवट व सहाय्यक व्यवस्थापक किनवट यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्तहेरांच्या प्राप्त माहितीवरून सदरची कारवाई केली. एक पिकअपगाडी आणि दोन लाकूड तस्कर पथकाच्या जाळ्यात अडकले असून तिसऱ्या तस्करांच्या शोधासाठी पथक हिमायतनगरकडे गेल्याचे वृत्त आहे. हे लाकूड निजामाबादकडे जाणार होते हे विशेष. २३ एप्रिल रोजी पहाटे साडेपाच वाजताच्या दरम्यान केलेल्या कारवाईत १३ नग सागवान आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेली पिकअप गाडी जप्त केली आहे. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत अंदाजे अडीच ते तीन लाख रुपये असल्याचे सांगण्यात येते. वनपाल पवार मॅडम, नागरगोजे, वनरक्षक बी.एस. वडजे, एल. जी.हमपल्ले, एम. एम. पाडदे, मोरताडे, सोमासे, केंद्रे, हाळे, मिसे आणि शेळके मामा इत्यादी कर्मचाऱ्यांचा पथकात समावेश होता.

## पाण्यासाठी वणवण....




मुखेड तालुक्यातील आबादीनगर तांडा, वसूर तांडा, भवानी तांडा व मुखेड शहरातील पाणीटंचाईचे भीषण संकट दिसत आहे. प्रशासनाने वेळीच पाणीटंचाई बाबत उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## डॉ.बी.आर.आंबेडकर फाऊंडेशनचा कृष्णाई पुरस्कार वितरण सोहळा २५ एप्रिल रोजी

नांदेड/प्रतिनिधी-डॉ. बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी भीमजयंतीच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या कृष्णाई पत्रकारिता व समता गौरव पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी एका शानदार सोहळ्यात होणार आहे. पुरस्काराचे हे यंदाचे २४ वे वर्षे आहे.

२५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता आयटीआय जवळील हॉटेल ताज पाटील येथील सभागृहात होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आ.भीमराव केराम हे राहणार आहेत. पुरस्काराच्या वितरणासाठी पीआरपीचे राष्ट्रीय अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, माजी आ. सुभाष वानखेडे, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कोहळीकर, मनपा सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश प्रवक्ते फारुख अहेमद, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बापूराव गजभारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.पुरस्कार सोहळ्यात प्रा.डॉ. लक्ष्मीकांत तांबोळी (समता गौरव पुरस्कार), मिकी घई, मुक्तेश्वर पाटील, विजय होकर्णे, डॉ. मनोज गिमेकर, अतुल राजूरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. याच सोहळ्यात नांदेड वाघाळा महापालिकेतील आंबेडकरी समाजाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार देखील करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक तथा संस्थेचे सचिव आकाश गजभारे यांनी दिली. २५ एप्रिल रोजी होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक आकाश गजभारे यांच्यासह स्वागताध्यक्ष श्रीकांतअण्णा गायकवाड, सतीश बनसोडे, अनिल हंकारे यांनी केले आहे.

## बालकामगार निर्मूलनासाठी नांदेड जिल्ह्यातून ठाम पाऊल

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा बालकामगारमुक्त करण्यासाठी नागरी समाज, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्व नागरिकांनी एकत्र यावे, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त आशिष सुरेखा दिलीप ढवळे यांनी केले आहे.

बालपण म्हणजे शिक्षण, खेळ आणि उज्वल भविष्यासाठीची तयारी. मात्र आजही अनेक मुले हॉटेल, गॅरेज, बांधकाम साईट, दुकाने आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली दिसतात. ही परिस्थिती समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. बालकामगार ही केवळ आर्थिक समस्या 'नसून ती एक गंभीर सामाजिक अन्यायाची बाब आहे. गरिबी, पालकांचे अशिक्षण, स्थलांतर आणि स्वस्त मजुरीची मागणी ही यामागील प्रमुख कारणे आहेत. काही नियोक्ते कमी मजुरीत जास्त काम करून घेण्यासाठी मुलांचा गैरफायदा घेतात, जे कायद्याने दंडनीय आहे.भारत सरकारच्या बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ नुसार १४ वर्षांखालील मुलांना कोणत्याही कामावर ठेवण्यास बंदी आहे. तसेच १४ ते १८ वयोगटातील मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास सक्त मनाई आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाते. नांदेड जिल्ह्यात कामगार विभाग, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांतून बालकामगार विरोधी मोहिमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये छापे, जनजागृती अभियान आणि बालकांचे पुनर्वसन यावर विशेष भर दिला जात आहे.

## आरटीई प्रवेशात गोंधळःतात्काळ सुधारणा करण्याची आ.राजेश पवार यांची मागणी



नायगाव/प्रतिनिधी-शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेत नांदेड जिल्ह्यात गंभीर त्रुटी व अनियमितता उघडकीस आल्या असून, यामुळे पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आ.राजेश पवार यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला धडक पत्र पाठवत तात्काळ सुधारणा करण्याची जोरदार मागणी केली आहे.

उपलब्ध माहितीनुसार, जिल्ह्यातील सुमारे २,१०३ जागांपैकी केवळ ४८७ प्रवेश निश्चित झाले आहेत, तर तब्बल २,७५७ विद्यार्थ्यांची निवड होऊनही प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी अजूनही प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ऑनलाईन प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी, कागदपत्र पडताळणीतील विलंब, तसेच स्पष्ट मार्गदर्शनाचा अभाव ही या गोंधळामागील प्रमुख कारणे असल्याचे समोर आले आहे. तक्रार निवारण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत नसल्याने पालकांच्या अडचणींमध्ये अधिक भर पडत आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार पवार यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच, निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, जिल्हास्तरावर तातडीने हेल्प डेस्क सुरू करावा आणि प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणाचा सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-वाजेगाव ते मुदखेड रोडवर सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीसांनी धाड टाकुन पाच जणांना अटक केली. मुदखेड रोडवरील आर.के.पेट्रोल पंपासमोर जुगार अड्डा सुरु होता. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी मध्यरात्री जुगार अड्डयावर धाड टाकुन शेख रियाज शेख अहेमद याच्यासह पाच जणांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे.

## माजी सरपंच सुदीन पाटील बागल यांच्या वतीने काकांडी येथे पाणपोई

नांदेड/प्रतिनिधी-वाढत्या उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे नागरिकांना दिलासा देण्यासाठी काकांडी येथे माजी सरपंच सुदीन पाटील बागल यांच्या वतीने थंड पाणपोई सुरू करण्यात आली आहे. नांदेड-हैदराबाद रोडवरील या पाणपोईचा लाभ वाहनधारकांसह प्रवासी आणि ये-जा करणारे नागरिक मोठ्या प्रमाणावर घेत आहेत.

दि.२१ एप्रिल रोजी या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्धव पाटील शिंदे, अमोल गोडबोले, शिवशक्ती महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पवार, कोल्हे, शिवसेना शाखाप्रमुख काकांडी रावसाहेब बंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.तसेच बाळू मंदवाड, मोतीराम कोंके, सुदर्शन कोंके, काळेश्वर बागल, नाना पाटील बागल, काशिनाथ बागल, भानुदास बागल, प्रदीप कोल्हे, रामा पोपळे, चंदू पांचाळ, ज्ञानेश्वर बागल, मारुती बागल, मोतीराम काळे आदींची उपस्थिती होती.उन्हाच्या झळा दिवसेंदिवस वाढत असताना नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या या पाणपोई उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. स्थानिक नागरिकांनीही सुदीन पाटील बागल यांच्या सामाजिक बांधिलकीचे स्वागत केले आहे.


### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री नागेश वि.पवार)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५८२/२०२६
श्रीकांत व इतर वि.निरंक

अर्जदार : १. श्रीकांत पि.तुकाराम नांगरे, वय : ४० वर्षे धंदा : मजुरी, २. विक्रांत पि.तुकाराम नांगरे, वय : ३८ वर्षे धंदा : व्यापार, दोघे रा.वजीराबाद, नांदेड, ता.जि.नांदेड, ३. ज्योती भ्र.विजय भदरगे, वय : ३८ वर्षे धंदा : घरकाम, रा.श्रावस्तीनगर,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत सुनंदा भ्र.तुकाराम नांगरे यांचे वारस आहेत. मयत सुनंदा भ्र.तुकाराम नांगरे यांचा दिनांक ३०/०८/२०१८ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार क्र.१ व २ ही मयताची मुले व अर्जदार क्र.३ ही मयताची विवाहित मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १७/०६/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.


आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

"आदेशावरुन"
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड


## धर्माबाद पोलीस स्टेशनमध्ये संगीत पहाटची मेजवानी

### सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा अनोखा उपक्रम



धर्माबाद/प्रतिनिधी-महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी धर्माबाद पोलीस स्टेशन येथे संगीत पहाट या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, भक्तीगीत आणि देशभक्तीपर गीतांच्या सुरेल मैफलीतून सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार आहे. हा उपक्रम पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.सकाळी ६ ते ८ या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात विविध धर्म, जाती आणि पंथातील नागरिक एकत्र येऊन सर्वधर्मसमभाव, बंधुता आणि सामाजिक सलोखा यांचा जागर करणार आहेत. तणावपूर्ण आणि वेगवान जीवनशैलीत समाजात एकोप्याची भावना टिकवून ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.संगीत पहाट हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून सामाजिक ऐक्याचा सेतू ठरणार आहे. देशभक्तीच्या सुरावटींसह नागरिकांना सकारात्मकतेची नवी पहाट अनुभवता येणार आहे. या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.याशिवाय स्थानिक गायक, कलाकार आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे. धर्माबाद तालुक्यातील नवोदित कलाकारांसाठी ही सुवर्णसंधी मानली जात आहे.या कार्यक्रमास सर्व समाजबांधव, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन धर्माबाद पोलीस स्टेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## धर्माबाद येथे सोमवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड व शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, धर्माबाद यांच्या संयुक्त विद्यमाने टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि. कँपनीमार्फत तरूणांसाठी टोयोटाचा शिका आणि कमवा या कौशल्य विकास उपक्रमांतर्गत जागतिक दर्जाचे निवासी तांत्रिक प्रशिक्षण विनामुल्य दिले जाणार आहे. नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी सोमवार २७ एप्रिल रोजी स.१० वा. पासून शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, धर्माबाद येथे पंडीत दिनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह / रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि. यांच्यामार्फत युवकांना तांत्रिक शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमात ऑटोमोटिव्ह वेल्ड टेक्निशियन, ऑटोमोटिव्ह पेंट टेक्निशियन, ऑटोमोटिव्ह असेंब्ली टेक्निशियन आणि मेक्ट्रॉनिक्स टेक्निशियन या कोर्सेस असून पात्रता वय १८ ते २१ वर्षे व शिक्षण १० वी, १२ वी पास असणे आवश्यक आहे. या उपक्रमातर्गत विद्यावेतन प्रथम वर्ष १५ हजार ८१५ रूपये प्रति महिना, व्दितीय वर्ष १७ हजार ६१५ रूपये प्रति महिना तसेच मूलभूत सुविधासह राहण्याची व जेवणाची व्यवस्था आणि सुरक्षितता व देखरेखसाठी २४ तास वार्डन असणार आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या संधीसाठी अर्ज करण्यास पात्र असणार असून जपना-इंडिया इंन्सिटट्युट फॉर मॅन्युफॅक्चरींग व नॅशनल ट्रेड सर्टिफिकेटचे प्रमाणपत्र मिळणार आहे.

## खंजर बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील मुख्य बसस्थानकात खंजर घेवून फिरणाऱ्या तरुणास बुधवारी रात्री पोलीसांनी अटक केली आहे. अब्दुल रहिम अब्दुल रहेमान (वय २०) रा.फुले मार्केट, नांदेड बुधवारी रात्री शहरातील मुख्य बसस्थानकात संशयास्पदरित्या फिरत असतांना पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ एक खंजर आढळून आला.


### टी.सी.हरवली आहे

माझी सोनाली राजकुमार वाहेवळ या नावाची ९ वी पासची टी.सी. शहरात ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
**सोनाली राजकुमार वाहेवळ**
नांदेड.

# २५ हजार लोकवस्ती कचऱ्याच्या विळख्यात;गोकुंदा ग्रामपंचायतीकडे डम्पिंग ग्राऊंडच नाही



किनवट/प्रतिनिधी- पंचवीस हजार लोकवस्ती असलेल्या गोकुंदा ग्रामपंचायतीला घनकचरा साठवण्यासाठी स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंड नसल्यामुळे भरवस्तीतील गोकुंदा रेल्वेगेटला लागून आणि जेथे रिकामी जागा सापडेल त्या ठिकाणी घनकचरा फेकून दुर्गंधीयुक्त परिसर करून नागरिकांच्या आरोग्याची ऐसी की तैसी चालवली आहे. घनकचरा साठवण्यासाठी लोकवस्तीच्या बाहेर स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंड देण्याची आवश्यकता आहे. परंतु सरपंचांसह सदस्यांच्या मानसिकतेवर अवलंबून आहे. मागील सत्ताधारी विश्वासपात्र निघाले नसल्याने उच्च शिक्षीतांच्या हाती गोकुंदा ग्रामपंचायतीच्या चाव्या देण्यासाठी सुजाण नागरिकांनी सत्तापरिवर्तन घडवले खरे, मात्र हाती पश्चातापच लागल्याच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

जिल्हाधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांनी या समस्या लक्षात घेऊन ग्रामपंचायतीचा समाचार घेण्याची अनेकांनी आवश्यकता व्यक्तविलीय. आरोग्य अधिकाऱ्यांनीही या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही तर ग्रामपंचायत प्रशासनाकडे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्याची मागणी होऊ लागलीय. ग्रामपंचायतीकडे गावाच्या कल्याणकारी शाश्वत विकासासाठी पंचवार्षिक धोरण रेखांकित आहे का ? तर शुन्य धोरण दिसून येते. एकोणीस कोटीच्या नवीन नळयोजना अर्धवट करून धूळखात पडून आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या पाणी पुरवठा विभागाने त्या नळयोजनेची कँन्ट्राटदारांशी संगनमत करून विल्हेवाट लावली आहे.दैनंदिन जीवनाशी थेट संबंध असलेल्या घनकचऱ्याच्या ज्वलंत समस्यांकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष करण्याचे कारण अद्यापही अस्पष्ट दिसते. लोकवस्तीच्या तुलनेत घंटागाड्या किती आहेत ? त्यांनी सांगायला हरकत नाही. गल्लोगल्ली घनकचरा कुंड्या लावायला ग्रामपंचायत प्रशासनाकडे वेळ नसावा म्हणून रस्त्यावर, वाहात्या नालीत कचरा फेकून नागरिकही कर्तव्य नाईलाज म्हणून पूर्ण करतात. घनकचरा साठवण्यासाठी स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंड उभारण्याची प्रशासनाने तसदी घेतलेली नाही. म्हणून सफाई कामगार केंव्हातरी नाली सफाई करून रस्त्यावर कचऱ्याचे ढिगार लावतात. मग जमेल तेंव्हा घंटागाड्या कचरा उचलून उघड्यावर कुठेही पैनगंगा किनारी स्मशानभूमी जवळ, सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या बाजूला रेल्वेगेट जवळ अशा अनेक ठिकाणी कचरा ठेवतांना दिसतात. पुर्वीचे सत्ताधारी या मुलभूत शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष करीत होते म्हणून उच्च शिक्षीतांच्या हाती सत्तेच्या चाव्या नागरिकांनी दिल्या परंतु लोकांच्या प्रती त्यांची अनास्था दिवस असल्याने लोकांकडून पश्चाताप व्यक्त केला जात आहे.

## तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी- कर्जबाजारीपणाला कंटाळून एका तरुण शेतकऱ्याने नदीत उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी सकाळी मुदखेड तालुक्यातील रोहीपिंपळगाव येथे घडली आहे. लक्ष्मण गंगाधर पावडे (वय २१) रा.रोहीपिंपळगाव यांनी शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. नापिकीमुळे बँकेच्या कर्जाची परतफेड करता आली नाही. बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेतून लक्ष्मण पावडे यांनी बुधवारी सकाळी आमदुरा येथील पुलावरुन नदीत उडी मारुन आत्महत्या केली. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात अकस्मीक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोणीत स्मशानभूमीवरुन अंत्यविधीचे राजकारण;ओबीसी महिलेचा मृतदेह अडवला

देगलूर/प्रतिनिधी-मौजे लोणी ता. देगलूर येथील गट क्रमांक १८६ मधील स्मशानभूमीच्या जागेवरून ओबीसी व एसटी समाजात उभा दावा निर्माण झाल्याने गावातील सामाजिक सलोखा धोक्यात आला आहे. दि. १५ रोजी ओबीसी समाजातील गिन्याबाई कोंडीबा कुंद्राळे यांच्या निधनानंतर त्यांचा अंत्यविधी रोखण्यात आल्याने हा वाद चिघळला आहे.

भाजपा ओबीसी आघाडीचे तालुका उपाध्यक्ष विजय पंढरीनाथ किशवे यांच्या नेतृत्वाखाली १९ ओबीसी नागरिकांनी दि.२२ रोजी तहसीलदार देगलूर यांना निवेदन देऊन तातडीने हद्दी निश्चित करण्याची मागणी केली. ग.क्र. १८६ मध्ये मलिकसाब भिकुमियाँ, शादुल भिकुमियाँ, पाशुमियाँ भिकुमियाँ यांच्या हिस्सेस ०.०५ आर इतकी जमीन स्मशानभूमीसाठी राखीव आहे. या जागेवर वंशपरंपरागत एसटी (कोळी, महादेव कोळी) व ओबीसी (हटकर, धनगर, कुंभार, वरटी) समाज अंत्यविधी करतात. मात्र १५ एप्रिल रोजी गिन्याबाई कुंद्राळे यांचा अंत्यविधी करताना एसटी समाजाने ही जागा आमची आहे असा दावा करून मृतदेह अडवला व अंत्यविधी दुसरीकडे करावा लागला. भविष्यात आमच्या वारसांचे अंत्यविधी कुठे करायचे? हा प्रश्न ओबीसी समाजाला सतावतो आहे. जर ०.०५ आर पैकी अर्धी जागा ओबीसी व अर्धी एसटी समाजासाठी निश्चित केली नाही, तर गावात शांतता भंग होऊन एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ओबीसी समाजाने तहसीलदारांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन पंचनामा करावा व दोन्ही समाजाच्या हद्दी कायमस्वरूपी निश्चित कराव्यात, अशी मागणी केली आहे. निवेदनावर नारायण सिद्धाम गारडे, केरबा गारडे, बाळू सिद्धाम गारडे, किशनराव भुताळे, बाळाजी भुताळे, विठ्ठल भुताळे, रालेराम कुंद्राळे, कोंडाबाई कुंद्राळे, संग्राम कुंद्राळे, बाळाजी ढवळे, दिगंबर पांडोळे, संग्राम पांडोळे, नामदेव कुंद्राळे, श्रीराम कुंद्राळे, गंगाधर ढवळे, पंडरी माळिक, व्यंकटेश माळिक, श्रीरंग माळिक व विशाल यांच्या सह्या आहेत.




मॉ गोदावरी सेवा समिती नांदेड तर्फे मॉ गोदावरी जलपुजन व शुद्धीकरण अभियानाचा शुभारंभ आ.आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सौ.सरस्वतीताई बोंढारकर, राजेशकुमार भराडीया, डॉ.सुरेश नुने, डा.राजेश कोमवाड, सुरेश पळशीकर, डॉ.रमेश नारलावार, अभिजित देशपांडे, तुलजेश यादव यांच्यासह इतर उपस्थित होते.

## विडुळमध्ये घरपोच गॅस सिलेंडर वितरणाचा बट्ट्याबोळ

उमरखेड/प्रतिनिधी- घरपोच गॅस सिलेंडरचे वितरण करणे आवश्यक असताना विडुळ मध्ये भर उन्हात बस स्टैंड वर सिलेंडरची वाहतूक करणारी गाडी उभी ठेवून सिलेंडर वितरित करणारा डिलिव्हरी बॉय गॅसधारकांना वेठीस धरत असल्याचे चित्र समोर आले आहे.

मागील दोन महिन्यापूर्वी इराण आणि अमेरिकेमध्ये युद्धजन्य परिस्थिती सुरू असताना संपूर्ण देशात गॅस सिलेंडर आणि पेट्रोल वितरित करण्याच्या कामात थोडा व्यत्यय आला होता. परंतु आता संपूर्ण परिस्थिती पूर्ववत होऊन कुठेही गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवणार नाही हे शासनातर्फे आणि संबंधित एजन्सी मार्फत गॅस धारकांना कळविण्यात आले होते. परंतु उमरखेड तालुक्यातील विडुळ मध्ये अजूनही याविरुद्ध विपरीत परिस्थिती असून गॅस पुरवठा संपूर्ण देशात पूर्ण पणे सुरळीत झाला असताना आणि घरपोच गॅस सिलेंडर वितरित करण्याचा नियम असून सुद्धा बसस्थानकाजवळ भर उन्हात गॅस सिलेंडर वितरित करण्याचा येथील डिलिव्हरी बॉयने सपाटा लावला आहे.

याव्यतिरिक्त प्रति सिलेंडर नियमाप्रमाणे नऊशे अडतीस रुपये दर असतानाही सदर डिलिव्हरी बॉय ९७० ते ९८० रुपये ग्राहकांकडून वाहतूक खर्चापोटी वसूल करत असल्याची माहिती गॅसधारकांकडून मिळाली आहे. दर दिवशी विडुळ मध्ये ५० ते ६० गॅस सिलेंडर वितरित केल्या जात असतात. अशा परिस्थितीत प्रति गॅस सिलेंडर ४० ते ५० रुपये घेऊन सदर डिलिव्हरी बॉय ग्राहकाकडून वसूल करून त्यांना आर्थिक खाईत लोटत आहे.सध्या तापमानात कमालीची वाढ झाली असून भर उन्हात बसस्थानकावर गॅस सिलेंडर प्राप्त करून घेण्यासाठी स्त्रीया, मजुरी करणारी मजूर आपली सर्व कामे बाजूला ठेवून सिलेंडर घेण्यासाठी ताडकळत उभे राहत असल्याचे चित्र विडुळ येथे दिसून येत आहे. त्यामुळे गॅसधारकांना कमालीचा मानसिक आर्थिक आणि शारीरिक त्रास भोगाव लागत असल्याने सबंधित एजन्सीने या त्रासातून विडुळ येथील गॅसधारकांची सुटका करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## नायगाव तालुक्यात गुटखा बंदी की,विक्रीला विशेष संधी?

नायगाव/प्रतिनिधी-गुटखा बंदी असतानाही नायगाव तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. पानटपरी, किराणा दुकाने आणि जनरल स्टोअर्समध्ये, उघडपणे गुटखा विक्री सुरू असून याकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे.

होलसेल विक्रेते नायगाव, काहळा,नरसी, पिंपळगाव आणि परिसरातील अनेक ठिकाणी गुटखा माफियांनी आपले जाळे घट्ट विणले असून काही ठिकाणी पोलिसांनाही चकवा देत अवैध व्यापार सुरू असल्याचे दिसते. विशेष म्हणजे काही ठराविक विक्रेते गुटखा मोठ्या प्रमाणात साठवून ठेवत असून मागणीनुसार ग्राहकांना पुरवठा केला जातो.दररोज लाखोंची उलाढाल होत असलेल्या या अवैध व्यवसायामुळे तरुण पिढी आणि शालेय विद्यार्थी गुटख्याच्या आहारी जात असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. गुटखा बंदीचा निर्णय कागदावरच राहिल्याची टीका नागरिकांमधून होत आहे.काही ठिकाणी छापेमारी करून किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई केली जाते; मात्र या मागील मोठ्या पुरवठादारांपर्यंत पोलिस पोहोचत नसल्याचेही आरोप आहेत. त्यामुळे मोठे मासे मोकाटच असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठोस आणि व्यापक कारवाई करून गुटखा विक्रीला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## तक्रार केल्याच्या संशयावरुन युवकाला मारहाण

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील हडसणी परिसरात अवैध वाळू तस्करीला विरोध केल्याच्या संशयावरून एका युवकाला वाळू माफियांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध पोलिसांत नॉन-कॉग्निजेबल गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

माहितीनुसार, फिर्यादी युवक हा मजुरी करून उदरनिर्वाह करणारा असून, दि.१९ एप्रिल रोजी रात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास तो गुरुकुल विद्यालय परिसरातून घरी परतत असताना काही आरोपींनी त्याला अडवले. आमच्या गाड्या नदीत सुरू असताना तू नायब तहसीलदाराला का कळवले? असा जाब विचारत आरोपींनी त्याच्यावर शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी त्याला धक्का-बुक्की करत मारहाण केली व तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकरणी अभिषेक कदम, ओंकार अर्जुन शिंदे, समाधान बंडू जाधव आणि परसराम दत्ता हुंबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भोकरमध्ये मध्यरात्री ४ फर्निचर दुकानांना भीषण आग; कोट्यवधींचे नुकसान

भोकर/प्रतिनिधी- शहरातील उमरी बायपास रोड लगत असलेल्या तिरूमला फर्निचर व साईकृपा फर्निचर ईतर ४ दुकानांना मंगळवारच्या मध्यरात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली.

या आगीत तिरूमला फर्निचर व साईकृपा फर्निचर ईतर २ दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून कोट्यवधी रुपयाचे नुकसान झाले आहे. याबाबत माहिती अशी की, भोकर शहरा लगत उमरी बायपास रोडला लागून तिरूमला फर्निचर व साईकृपा फर्निचर दुकाने असून सागवान लाकडाचे साहित्य इथे बनविल्या जाते फर्निचर बनविणाऱ्या विविध मशीन दोन्ही दुकानांमध्ये होत्या फर्निचर बनवून तयार करून ठेवण्यात आले होते फर्निचर बनवण्यासाठी लागणाऱ्या मशीन सुद्धा दुकानात होत्या अंदाजे ४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच भोकर नगर परिषद व हिमायतनगर नगर परिषद येथील अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. भोकर येथील अग्निशमन कर्मचारी त्रिरत्न कावळे, रमाकांत मरकंडे, संदीप श्रीराम पवार, बालाजी कल्याणकर, कपील कांबळे तसेच हिमायतनगर येथील शेख मुक्तार, सतीश आडे, शेख फिरदौस आदींनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. काही तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मोठ्या



प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. आग कशामुळे लागली याबाबत चौकशी करण्यात येत आहे. तहसीलदार विनोद गुंडमवार पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी घटनास्थळी भेट देऊन महसूल विभागाने पंचनामा केला.

## संभाजीराव फुलवळे यांचे निधन

मांडवी/प्रतिनिधी-निवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी संभाजीराव जीवबा फुलवळे यांचे दीर्घ आजाराने आज, दि. २३ एप्रिल



रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६७ वर्षे होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या पार्थिवावर आज, दि. २३ एप्रिल रोजी सायंकाळी पळशी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते विठ्ठल फुलवळे व माधव फुलवळे यांचे वडील होत.

पान १ वरुन

### हडसणी फाट्याजवळ...

घेराव घातला. जोपर्यंत या ठिकाणी रस्ता रुंदीकरण आणि अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत आम्ही हटणार नाही,असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.या भीषण अपघातामुळे हडसणी परिसरात शोककळा पसरली असून, नरवाडे कुटुंबावर कोसळलेल्या या आघाताने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### आ.संजय गायकवाडांकडून...

वर्तुळात संताप व्यक्त होत आहे.यावेळी प्रकाशक प्रशांत आंबी यांनी संबंधित पुस्तक १९८८ साली प्रकाशित झाले असून ते स्वतःने नव्हे तर कॉ.गोविंद पानसरे यांनी लिहिले असल्याचे स्पष्ट केले. तसेच पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे सांगत, आधी पुस्तक वाचण्याची विनंतीही त्यांनी केली. मात्र, त्यानंतरही फोनवरील वाद कायम राहिल्याचे सांगितले जात आहे.प्रशांत आंबी यांनीही ठाम भूमिका घेत तुम्ही उद्या माझी जीभ कापायला या असे प्रत्युत्तर दिल्याचे समोर आले आहे. दरम्यान, आ. संजय गायकवाड यांचे नाव यापूर्वीही अनेक वादांत चर्चेत आले आहे.

### राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा...

चालूच होता. या संपात महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण नारमवार, सल्लागार ना.रा. जाधव, मराठवाडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार, श्याम जाधव, ॲड. बालाजी सरोदे, धनंजय साले, डॉ.विठ्ठल भंडारे, सतीश पवार, शुभम चव्हाण, शिवशंकर मोरे, मस्के, यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी व शिक्षक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प.बंगालच्या मतदानावर...

लांबच लांब रांगा दिसून आल्या. महिलांचा सहभाग विशेषत्वाने जाणवत होता. निवडणूक आयोगाकडून वेबकास्टिंगद्वारे प्रत्येक बूथवर लक्ष ठेवण्यात येत असून उर्वरित १४२ जागांसाठी २९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहेत.

### भाजपा युवा मोर्चाच्या वतीने...

मंजूशा राणवळकर, ज्योत्स्ना लांडगे, सुषमा थोरात, सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, उमेश चव्हाण,विजय येवणकर, विजय गंभीरे,शीतल खांडील,ओम बंडेवार,करण चव्हाण,शिवा लोट,प्रियेश ठाकूर, शिवकुमार बैनवाड, राहुल देशमुख,पवित आरतीया,अक्षय पवार, विशाल गिरी, अर्जुन कोकाटे,विशाल संपतावर, शुभम खोडके यांच्यासह भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४